# खंडणी मागणाऱ्या तीन आरोपींना अटक

नांदेड, दि. ३० (प्रतिनिधी) - पुन्हा एकदा नांदेडात रिंधा गँगची दहशत पसरू लागली की काय, अशी शंका आता येऊ लागली असून, एका गिट्टी क्रशरच्या मालकास एक कोटीची खंडणी मागणाऱ्या तीन आरोपींना पोलिसांनी गुरुवारी रात्री अटक केली. यात एका महिलेचा समावेश आहे. आरोपींनी गोळीबार केल्यानंतर त्याला पोलिसांनीदेखील प्रत्युत्तर देऊन आरोपींना अटक केली.

गुरुवारी रात्री तेजस हरिकिशन लोहिया या गिट्टी क्रशरचालकास विदेशातील फोन नंबरवरून खंडणीसाठी धमकीचा फोन आला. यापूर्वीदेखील त्यांना असेच फोन आल्याने त्याबाबतची तक्रार त्यांनी २२ जून रोजी वजिराबाद पोलीस ठाण्यात दिली होती. त्यानंतर गुरुवारी सकाळीदेखील अशाच प्रकारचा फोन आल्यानंतर त्यांनी पोलिसांना ही माहिती कळवली. सोबतच खंडणीखोरांनाही गिट्टी क्रशरच्या ठिकाणी या, असे सांगितले. त्यानुसार गुरुवारी सायंकाळी खंडणीखोर त्याठिकाणी आले. चारचाकीतून आलेल्या आरोपींनी पोलीस दिसताच आपल्या बंदुकीतून गोळी झाडली. पोलिसांनीदेखील गोळीनेच प्रत्युत्तर दिले. सर्व गोळ्या त्यांच्या गाडीवर लागल्या. पोलिसांनी लगेच आरोपींना अटक केली. वजीरसिंघ फौजी (रा.बडपुरा, नांदेड), जयदेव राघो (रा. रविनगर, कौठा), अंकिता नानासाहेब कांबळे (रा.उबाळेनगर, वाघोली, पुणे) अशी या तीन आरोपींची नावे आहेत. सोनखेड पोलीस ठाण्यात तेजस लोहिया यांनी तक्रार दिली. ही घटना सोनखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीत ढाकणी शिवारात घडली.

सामना 01/07/2023

सकाळ दि 01/07/2023



नांदेड : रिंधाच्या नावाने खंडणी मागणाऱ्या टोळीला अटक करण्यात आली आहे. यावेळी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अबिनाशकुमार, द्वारकादास चिखलीकर, चंद्रकांत पवार आदी उपस्थित होते.

01/07/2023 सकाळ

# रिंधाच्या नावाने खंडणी मागणाऱ्या टोळीला अटक

## पिस्टलसह दोन लाख, चारचाकी, दुचाकी जप्त

नांदेड, ता. ३० (बातमीदार) : कुख्यात दहशतवादी हरविंदरसिंघ उर्फ रिंधाच्या नावाने खंडणी मागणाऱ्या टोळीला नांदेडच्या पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्याकडून एक गावठी पिस्टल, दोन जीवंत काडतूस, एक रिकामे काडतूस, खंडणी म्हणून स्विकारलेले दोन लाख रुपये तसेच गुन्ह्यात वापरलेली एक चारचाकी आणि एक दुचाकी जप्त करण्यात आली आहे.

जिल्हा पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी ही माहिती शुक्रवारी (ता. ३०) पत्रकार परिषदेत दिली. यावेळी अतिरिक्त पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार, उपविभागीय पोलिस अधिकारी सुरज गुरव, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर, सहायक पोलिस निरीक्षक चंद्रकात पवार, फौजदार दशरथ आडे आदी उपस्थित होते.

एका व्यापाऱ्यास गुरूवारी (ता. २९) मोबाईलच्या व्हॉट्सॲप कॉलवरून फोन करून रिंदा बोलत असून मला एक कोटी रुपये खंडणीची मागणी केली. त्यानंतर ठार मारण्याची धमकी दिली. त्यामुळे व्यापाऱ्याने पोलिसांना ही माहिती दिली. त्यावरून पोलिसांनी सापळा रचला. अनोळखी फोनधारकाने व्यापाऱ्यास कारमध्ये पैसे घेऊन उस्माननगर रस्त्यावर येण्यास सांगितले. त्यानंतर आरोपींनी त्यांची कार व्यापाऱ्याच्या कारसमोर आडवी लावली. त्याचवेळी एका दुचाकीवरून एक सरदार आणि एक महिला आली. कारचालकाने खंडणीची रक्कम दुचाकीस्वारास देण्यास सांगितली. त्याचवेळी पोलिसांच्या पथकाने छापा टाकून सर्वांना पकडण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी कारचालकाने पोलिसांच्या दिशेने फायर केला. त्यानंतर पोलिसांनी बचावाच्या उद्देशाने फायर केला. त्यानंतर सर्व पोलिस अधिकारी व अंमलदार यांनी तिघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून मुद्देमाल आणि वाहने जप्त करण्यात आली आहेत.

याबाबत सोनखेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्याचा तपास विशेष पोलिस महानिरीक्षक डॉ. शशीकांत महावरकर, पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली सोनखेडचे सहायक पोलिस निरीक्षक विशाल भोसले करत आहेत.